अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याबाबत. (केंद्र हिस्सा निधी वितरण पध्दती)

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

शासन निर्णय क्रमांकः भासशी-२०२२/प्र.क्र.७४/शिक्षण-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १७ मार्च, २०२२

**वाचा :-**

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग (मातं) क्रमांक मातंस-२०१८/प्र.क्र.१३८/एस-१/३९, दि. १२.१०.२०१८

२) शासन परिपत्रक क्र. इबीसी-२०१८/प्र.क्र.४८४/शिक्षण-१, दि. ०८ जानेवारी, २०१९

३) सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार यांनी माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनाकरीताचे सुधारीत मार्गदर्शक सूचना.

४) सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे पत्र क्र. फाईल नं. के- १४०११/२५/२०२१-एससीडी-V, दि. ०१/११/२०२१

**प्रस्तावना :-**

अनुसूचित जाती प्रवर्गातील मुला-मुलींनी उच्च शिक्षण घेणे, त्यांच्या गुणवत्तेत वाढ करणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेऊन उच्चविद्याविभुषित होणे, हा उद्देश ठेऊन अनुसूचीत जाती (नवबौध्दासह) विद्यार्थ्यांकरीता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन १९५९-६० पासून राबविण्यात येत आहे.

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी अनुसुचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता माहे मार्च, २०२१ पासून सुधारीत मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत. त्यानुषंगाने सदर मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे. केद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुधारीत निधी वितरण कार्यपध्दती राज्यभरात अवलंबवयाची आहे. केंद्र शासनाच्या दिनांक ०१.११.२०२१ च्या पत्रान्वये सूचित केल्याप्रमाणे सुधारीत निधी वितरण कार्यपध्दतीचा राज्यात अवलंब न केल्यास सदरहू शिष्यवृत्ती योजनेंतर्गत राज्य शासनास अनुज्ञेय असलेली केंद्रीय अनुदानाच्या रकमेची (केंद्र हिस्सा ६०%) अदायगी करता येणार नाही. तसेच त्या त्या आर्थिक वर्षात प्राप्त होणारे केंद्रीय अनुदान अखर्चित राहिल्यास पुढील आर्थिक वर्षात खर्च करणेसाठी पुर्नविनियोजन करता येणार नाही असे देखील सूचित करण्यांत आलेले आहे.

सदर बाब विचारात घेता केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील निधी वितरणांशी संबंधीत मुद्दा क्र. ११.१ व ११.२ मधील तरतूदी व १०.१ मधील तरतूद स्विकारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.



TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

शासन निर्णय :-

प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता माहे मार्च, २०२१ पासून जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनामधील निधी वितरणाशी संबंधीत मुद्दा क्र. ११.१ व ११.२ मधील खाली नमुद तरतूदीं व १०.१ मध्ये नमुद सूचना स्विकारण्यात येत आहेत.

(१) केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. ११.१ नुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सदरहू शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मंजूर झालेली संपूर्ण रक्कम म्हणजेच महाविद्यालयाला देय असलेले सर्व प्रकारचे ना-परतावा शुल्क, (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर शुल्क इत्यादी.) तसेच विद्यार्थ्यांना अनुज्ञेय निर्वाह भत्ता व इतर अनुज्ञेय शुल्क / भत्ते इत्यादी रक्कम थेट विद्यार्थ्यांच्याच आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये जमा होणे आवश्यक आहे. याकरीता राज्य शासनाने PFMS (Public Finacial Management System) या प्रणालीव्दारे लाभाची अदायगी करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे सदर सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. ११.२ नुसार सन २०२१-२२ पासून मंजूर झालेली शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम संबंधीत विद्यार्थ्याच्या थेट बँक खात्यामध्ये DBT (Direct Beneficiary Transfer) तत्वावर जमा करण्यांत यावी.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. १०.१ नुसार, सन २०२०-२१ पासून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतीवर्षी अर्थसंकल्पीत करण्यांत येणा-या तरतूदीच्या ६०% केंद्र हिस्सा म्हणून निश्चित करण्यांत आलेला असून राज्य शासनाचा उर्वरीत ४०% बांधील खर्च निश्चित करण्यांत आलेला आहे. सदरचे निधी विभागणीचे सूत्रास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील सर्व अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे मंजूर झालेली शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे सुधारीत वितरण पध्दतीने अदा करण्यांत येणार आहे.

**(अ) केंद्र शासनाच्या ६० % च्या हिश्श्याचे वितरण :-**

महाडीबीटी प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत अर्ज संबंधीत जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे मार्फत मंजूर झाल्यानंतर त्या शैक्षणिक वर्षाची अनुज्ञेय शिष्यवृत्ती रक्कम प्रणालीव्दारे निश्चित करण्यांत येते. सदरहू मंजूर करण्यात आलेली संपूर्ण शिष्यवृत्तीची रक्कम म्हणजेच महाविद्यालयास देय असणारा भाग (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर नापरतावा शुल्क इ. ) तसेच विद्यार्थ्याला देय असणारा भाग (निर्वाह भत्ता) या दोन्ही भागांच्या एकत्रित रक्कमेचा केंद्र हिस्सा ६० % या प्रमाणात लाभाची रक्कम केंद्र शासनाच्या प्रणालीमध्ये निश्चित करण्यांत येणार आहे. उपरोक्त निश्चित करण्यात आलेला केंद्र हिस्सा (६० %) विद्यार्थ्याने महाडीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत केलेल्या अर्जानुसार त्यांच्या आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये थेट केंद्र शासनामार्फत DBT तत्वावर वितरीत करण्यांत येणार आहे.

सदरहू केंद्र हिस्सा विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर विद्यार्थ्यास अनुज्ञेय असलेला निर्वाह भत्ता वजा जाता उर्वरीत महाविद्यालयास देय असलेली रक्कम विद्यार्थ्याने पुढील सात दिवसांच्या आत महाविद्यालयास जमा करणे अनिवार्य आहे.यासाठी संबधीत महाविद्यालयांने त्यांच्याकडून विहित नमुन्यात हमीपत्र घ्यावे.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

(ब) राज्य शासनाच्या ४० % हिश्श्याचे वितरण :-

उपरोक्त मुद्दा क्र. (२) अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शिष्यवृत्तीच्या एकूण मंजूर झालेल्या रक्कमेच्या केंद्र हिस्सा (६० %) वजा जाता उर्वरीत राज्य हिस्सा (४० %) ची रक्कम राज्य शासनाच्या महाडिबीटी पोर्टल मार्फत वितरीत करण्यांत येईल. सदरहू राज्य हिस्सा सन २०२०-२१ पर्यंतच्या वितरण कार्यप्रणालीनुसार DBT तत्वावर संबंधीत विद्यार्थ्याचे आधार संलग्नीकृत बँक खाते व संबंधीत महाविद्यालयाचे बँक खात्यामध्ये थेट PFMS प्रणालीव्दारे मंजूर रक्कम वितरीत करण्यांत येईल.

२. सदरहू शासन निर्णय केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या सन २०२१-२२ ते २०२५-२६ साठीच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील निधी वितरणाशी संबंधीत मुद्दा क्र.१०.१, ११.१ व ११.२ पुरता मर्यादीत असून केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सन २०२१-२२ ते २०२५-२६ साठीच्या विस्तृत सुधारीत मार्गदर्शक सूचना स्वंतत्रपणे निर्गमीत करण्यात येतील.

३. सदरहू शासन निर्णय नुसार केंद्र योजनेसाठी येणारा खर्च मागणी क्र. एन-३ (०४) शिष्यवृत्ती आणि विद्यावेतने, (०४) (१६) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, (केंद्रपुरस्कृत १०० टक्के), (कार्यक्रम), ३४, शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, **(लेखाशीर्ष- २२२५ ०४९५)** मागणी क्र.एन-३(०४) शिष्यवृत्त्या आणि विद्यावेतने, (०४) (०१) भारत सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्त्या (कार्यक्रम) ३४, शिष्यवृत्त्या/विद्यावेतने लेखाशीर्ष ( **२२२५ ०३५२)** या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यांत येऊन त्याखाली केलेल्या तरतूदीतून भागविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( विष्णुदास पुं. घोडके )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
४. मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
९. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
१०. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण,
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२. उपसचिव (अर्थसंकल्प)/(विघयो), सा.न्या.व वि.स.वि., मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (का.शिक्षण-१)